# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव  **P.S.(ठाणे):** फैजपूर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0058  **Year (वर्ष):** 2026
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**30/03/2026 16:55

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिंनाक पासून):** 20/03/2026
      **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 20/03/2026
      **Time From (वेळेपासून):** 12:45 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:10 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिंनाक ):** 30/03/2026  **Time (वेळ):** 16:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 019
      **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 30/03/2026 16:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 17 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** यावल पिळोदा रोडवर, हॉटेल समृध्दी जवळ, ता यावल

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रेश्मा चंद्रकांत अवतारे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** चंद्रकांत अवतारे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग जळगाव,जिल्हापेठ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग जळगाव,जिल्हापेठ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850906200

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री गायकवाड पुर्ण नाव माहीत नाही | | | 1. वनविभाग,फैजपूर ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

स्टेशन फैजपुर पोलीस

दि. 30/03/2026

मी रेश्मा चद्रकांत अवतारे, वय 35 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, जळगाव. मो.न. 985006200

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देते की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, जळगाव येथे पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे.

दि.19.03.2026रोजी तकारदार ज्ञानेश्वर वनराज कोळी यांनी पोलीस उप अधिक्षक, श्री. योगेश ठाकुर ला.प्र.वि., जळगाव यांचेशी फोनद्वारे संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेसंबंधी तकार असलेबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने तकारदार हे दि. 20/03/2026 सकाळी 09.45 वाजेच्या सुमारास आपणांस भुसावळ मधील शांतीनगर येथील सोमाणी गार्डनमध्ये भेटणार असुन त्यांची तकार घेवुन पुढिल कारवाई करण्याबाबत पोलीस उप अधीक्षक श्री योगेश ठाकुर यांनी आम्हास निर्देशित केले होते.त्याप्रमाणे आम्ही मा. उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जळगाव व मा. जिल्हाधिकारी सा‍ो, जळगाव यांना गोपनिय कामासाठी प्रत्येकी एक शासकिय कर्मचारी पंच म्हणुन मिळणेबाबत पत्र देवुन तेजस सपकाळे व चेतन राजपुत यांना दि. 20/03/2026 रोजी सकाळी 09.00 वाजेपावेतो ला.प्र.वि. कार्यालय, जळगाव कार्यालयात उपलब्ध करून त्यांना पंच म्हणुन नियुक्त केले होते.त्यानंतर दि. 20/03/2026 रोजी आम्ही, वर नमुद पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार पोहवा/बाळु मराठे, पोकॉ/राकेश दुसाणे यांचेसह सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या साहित्यासह शासकिय वाहन क. MH-19-EA-6021 वरील चालक श्रेणीपो.उप.निरी. सुरेश पाटील, नेम. मोटार परिवहन विभाग, जळगाव यांचेसह अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयातुन रवाना होवुन तकारदार यांनी सांगितल्याप्रमाणे भुसावळ मधील शांतीनगर येथील सोमाणी गार्डनमध्ये जावुन तकारदार यांची भेट घेतली. सदर ठिकाणी एक इसम मोटर सायकलसह उपस्थित होता. त्यास आम्ही नाव, पत्ता विचारुन खात्री करता तो तकारदार ज्ञानेश्वर कोळी असल्याची खात्री झाली. आम्ही त्यास शासकिय वाहनात बसवुन पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव ज्ञानेश्वर वनराज कोळी, वय 34 वर्ष, व्यवसाय लाकुड वाहतुक, रा. पाडळसे, ता.यावल, जि. जळगाव असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांची आपसात ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली. आम्ही तक्रारदार ज्ञानेश्वर कोळी त्यांचे तकारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की, तकारदार श्री. ज्ञानेश्वर कोळी यांचेकडे दोन बोलेरो पिकअप वाहने असुन ते त्याव्दारे ट्रिपप्रमाणे अंजाळे, पाडळसे व आजुबाजुच्या परिसरामध्ये लाकुड वाहतुक करतात. त्यादरम्यान त्यांना मार्च महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये वनविभागाचे नाकेदार श्री. गायकवाड भेटले व म्हणाले होते की, "तु तुझ्याकडे असलेल्या दोन बोलेरो पिकअप वाहनाव्दारे लाकडाची वाहतुक करतो, तु मला मासिक हप्ता देत नाही. तुझ्या गाडया मला लाकुड वाहतुक करतांना मिळुन आल्या तर मी तुझ्यावर गुन्हा दाखल करेल आणि गाडया जप्त करेल, असा तकारदार यांना दम दिला होता. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना असे न करण्याची विंनती केली असता गायकवाड यांनी तक्रारदार यांचेकडे प्रत्येक गाडीचे महिन्याला 5000/- रूपये प्रमाणे दोन्ही गाडयांचे दरमहा एकुण 10000/- रूपयांची मागणी केली होती. त्यावर तक्रारदार यांनी मी तुम्हाला नंतर येवुन भेटतो. असे सांगुन तकारदार निघुन गेले होते.त्यानंतर नाकेदार श्री गायकवाड यांनी तक्रारदार यांना दि. 19.03.2026 रोजी त्यांच्या मोबाईलवरुन फोन करुन सांगीतले की, मी च तुला फोन लावु का? तु नाही मला फोन लावणार का? असे सांगीतले असता तक्रारदार यांनी त्यांना तुम्हाला उद्या

फोन करतो, असे सांगुन फोन कट केला.तक्रारदार यांनी वन विभागाचे नाकेदार श्री. गायकवाड यांना त्यांचे मागणीप्रमाणे दोन्ही बोलेरो पिकअप वाहनाचे दर महिन्याला 10000/- रुपये दिले नाही तर ते तकारदार यांचेवर केस करतील व त्यांची वाहने जप्त करतील, म्हणून तक्रारदार हे नाईलाजास्तव नाकेदार श्री. गायकवाड यांना लाच रक्कम देण्यास तयार झाले आहे.

तकारदार यांचेकडील दोन्ही पिकअप वाहनातुन लाकुड वाहतुक सुरळीत सुरू ठेवुन त्यावर कोणतीही कारवाई न करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे वनविभागाचे नाकेदार श्री. गायकवाड यांनी 10000/- रूपयांची लाच रक्कम मागणी केली, म्हणुन तकारदार यांनी दि. 20/03/2026 रोजी वनविभागाचे नाकेदार श्री. गायकवाड, यांचेविरूध्द लाच मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी सविस्तर तकार दिली होती.सदर तकारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाईबाबत आम्ही तकारदार ज्ञानेश्वर कोळी व पंच क.1 श्री. तेजस सपकाळे व सापळा पथकातील सदस्यांना लाचमागणी कारवाई संदर्भात योग्य त्या सुचना दिल्या. तक्रारदार यांनी दिलेल्या तकारीच्या अनुषंगाने लाच मागणी पडताळणी कारवाई करणे आवश्यक असल्याने आम्ही तक्रारदार यांना नाकेदार श्री. गायकवाड हे आपणास कोठे भेटतील, अशी विचारणा केली असता त्यांनी मी नाकेदार श्री. गायकवाड यांना फोन केल्यास समजु शकेल, असे सांगीतले. त्याप्रमाणे पोहवा/बाळु मराठे यांनी नविन मेमरीकार्ड काढून ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करून तकारदार यांनी श्री. गायकवाड यांना फोन करून "येणार होते न तुम्ही? असे विचारले. तेव्हा त्यांनी "मी चिखलीला आहे" असे सांगीतले. तेव्हा तकारदार यांनी त्यांना "कुठे येउ मग? असे विचारले असता त्यांनी "मी करतो" असे सांगीतले. तेव्हा तकारदार यांनी "बर" असे बोलुन फोट कट केला. त्यानंतर नाकेदार श्री गायकवाड हे चिखली, ता. यावल या ठिकाणी असल्याने आम्ही सापळा पथकासह सदर ठिकाणाहुन निघुन आम्ही पुढिल कारवाई यावल पिळोदा रस्त्याचे बाजुस असलेल्या शेतातील निंबाचे झाडाखाली करण्याचा निणय घेवुन पुढिल सापळा कारवाईस सुरू केली.त्यानंतर 12.41वाजेच्या सुमारास श्री. गायकवाड यांनी तक्रारदार यांचे मोबाईल फोनवर फोन करून पिळोद्याला हॉटेल समृध्दीचे जवळ असल्याचे कळवुन सदर ठिकाणी येण्याबाबत सांगितले.त्याप्रमाणे आमचे सुचनेवरून पोहवा/बाळु मराठे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तकारदार ज्ञानेश्वर कोळी यांचे शर्टचे आत लावुन दिले व तकारदार व पंच क 1 सपकाळे यांना तक्रारदार यांचे मोटर सायकलने श्री. गायकवाड यांची भेट घेण्यासाठी यावल पिळोदा रस्त्यावरील हॉटेल समृध्दी जवळ रवाना केले होते.

त्यानंतर तकारदार व पंच क. 1 हे सापळा पथकाजवळ परत आले व त्यांना घडलेली हकिकत विचारणा केली असता त्यांनी हकिकत सांगितली व लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण आम्ही सापळा पथक व दोन्ही पंचासमक्ष ऐकून खात्री केली असता तक्रारदार यांचे दोन बोलेरो पिकअप गाडयाने लाकुड वाहतुक सुरळीत चालु देण्याविषयी चर्चा झाली. त्यावेळी नाकेदार श्री. गायकवाड यांनी तक्रारदार यांना "नई रे भो... (दोन्ही हाताचे दहा बोटे दाखवुन इशाराने)... नाही तर राहु दे, तुया जवळस त्यावेळेस उग है केलेस... तुला माहीती आहे न गेल्या वेळेस करतो न तस कर रितीरिवाजाप्रमाणे" असे म्हटले. तक्रारदार यांनी त्यांना "दहा जास्त होता न दादा" असे सांगीतले. श्री. गायकवाड यांनी तक्रारदार यांना "तुझा एकटया कडुन अस नाही.. तु उलट बाकीच्यांना विचार, दामु दादाला विचार, माझ असं म्हनणं नाही, तु का परका हे अस नाही" असे म्हटले. तेव्हा तक्रारदार यांनी श्री. गायकवाड यांना "दोन एक कमी करा, आठ हजार घे जा.. असे सांगीतले. श्री. गायकवाड यांनी तक्रारदार यांना त्याचे उजव्या हाताचे पाच बोटे व डाव्या हाताचे चार बोटे दाखवुन नऊ चा इशारा केला. तेव्हा तकारदार यांनी "नऊ हजार..? चालीन" असे म्हटले. तेव्हा श्री. गायकवाड यांनी "तु भी नाराज नको" असे बोलुन तकारदार यांचेकडुन 9000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याची खात्री झाली.

नाकेदार श्री. गायकवाड यांना तक्रारदार यांनी पंधरा वीस मिनीटांत पैसे आणुन देतो, असे सांगितल्याने व दरम्यानची कारवाई करण्यास वेळ कमी असल्याने आम्ही पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्ररित्या करण्याचा निणय घेतला. त्यानंतर तक्रारदार यांनी नाकेदार श्री. गायकवाड यांनी मागणी केलेले 9000/- रूपये आमचे समक्ष हजर केले. आम्ही लाचेची रक्कम देण्याअगोदर सापळापुर्व पंचनामा कारवाई केली. आम्ही तक्रारदार यांनी हजर केलेली 9000/- रूपयांच्या नोटांना पोकों/राकेश दुसाणे यांनी अ.पा. पावडर लावुन नोटांची घडी करून तकारदार यांचे शर्टच्या वरील डाव्या बाजुच्या खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या.

त्यानंतर आमचे सुचनेवरून पोहवा/बाळु मराठे यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकुन ते सुरु करुन तकारदार ज्ञानेश्वर कोळी यांचे शर्टचे आत लावुन दिले. त्यानंतर आम्ही तकारदार व पंच क.1 सपकाळे यांना आवश्यक त्या सुचना देवुन तकारदार यांना लाचेची रक्कम देऊन पंच क.1 सपकाळे यांचे सह नाकेदार श्री. गायकवाड यांना देण्यासाठी सापळा पथकापासुन तकारदार यांचे मोटार सायकलने यावल-पिळोदा रस्त्यावरील समृध्दी हॉटेलच्या मागे रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे रस्त्यावरील समृध्दी हॉटेलच्या आजुबाजुस परिस्थितीनुरूप जागा घेवुन थांबले. बराच वेळानंतर तक्रारदार यांनी उरवुन दिल्याप्रमाणे लाचरक्कम

स्विकारल्याचा कोणताही ईशारा न करता ते सापळा पथकाजवळ परत आले, तेव्हा त्यांनी सांगितले हकिकत व सापळा कारवाई दरम्यान डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण आम्ही सापळा पथक व दोन्ही पंचासमक्ष ऐकुन खात्री केली असता तकारदार यांना नाकेदार श्री गायकवाड यांनी यावल-पिळोदा रस्त्यावरील हॉटेल समृध्दी जवळ या ठिकाणी बोलविले होते. त्याप्रमाणे तकारदार यांनी सदर ठिकाणी जावुन खात्री केली असता नाकेदार श्री. गायकवाड हे तेथे मिळुन आले नाही, म्हणून तक्रारदार यांनी नाकेदार श्री. गायकवाड यांना फोन करून विचारणा केली. त्यावेळी नाकेदार श्री. गायकवाड यांनी तक्रारदार यांना "मी पिळोदा ते पाडळसाचे मध्ये आहे" म्हटल्यावर तकारदार यांनी "मी तोल नाक्यावर उभा होता" तेव्हा श्री. गायकवाड यांनी "तुझा आवाज येत नाही "असे बोलुन फोन कट केला, अशी हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही तकारदार यांना नाकेदार श्री. गायकवाड यांना फोन लावण्याचा र्निणय घेवुन तकारदार यांनी आमचे सुचनेवरून श्री. गायकवाड यांना फोन केला असता, श्री. गायकवाड यांनी फोन उचलला नाही. आम्ही तक्रारदार यांना श्री. गायकवाड यांचा फोन येण्याची वाट पाहीली असता तकारदार यांना श्री. गायकवाड यांचा फोन आला नाही. त्यानंतर आम्ही तक्रारदार याने श्री. गायकवाड यांना वारंवार फोन केल्यास त्यांना संशय येईल, म्हणुन आम्ही तक्रारदार यांनी श्री. गायकवाड यांना फोन न करण्याचा र्निणय घेतला. श्री. गायकवाड यांना फिरस्ती ड्युटी असल्याने त्याचे कार्यालय निश्चित कुठे आहे? बाबत तक्रारदार यांना माहीती नाही, म्हणुन आम्ही दिंनाक 20/03/2026 रोजी करण्यात आलेली कारवाई स्थगीत करून पुढील कारवाई दिंनाक 21/03/2026 रोजी सकाळी 10.00वाजता करण्याचा र्निणय घेवुन दिंनाक 20/03/2026रोजीचा लाच मागणी पडताळणी/सापळा कारवाई स्थगिती पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिंनाक 21/03/2026 रोजी ला.प्र.वि., जळगाव कार्यालय येथुन आम्ही, सापळा पथक व दोन शासकीय पंचांसह सरकारी वाहनाने सापळा कारवाईकरीता आवश्यक त्या सर्व साधन सामुग्रीनिशी निघुन यावल पिळोदा रस्त्यावरील एका शेतात तक्रारदार यांना पथकासह 10.45 वाजता भेटलो. त्यानंतर पुढील सापळा कारवाई सुरू केली. आम्ही तक्रारदार यांना नाकेदार श्री. गायकवाड हे कुठे भेटतील? याबाबत फोन करून खात्री करण्यास सांगितले असता, तकारदार यांनी आमचे सुचनेवरून श्री गायकवाड यांना फोन केला असता त्यांचा फोन लागला नाही. त्यानंतर थोड्या वेळाने तक्रारदार यांनी पुन्हा श्री. गायकवाड यांना फोन केला असता त्यांचा फोन बंद आला. आम्ही श्री. गायकवाड यांचे फोन कॉल येण्याची मार्ग प्रतिक्षा केली, परंतु त्यांचा तकारदार यांना फोन आला नाही. त्यानंतर नाकेदार श्री. गायकवाड यांची डयुटी नेहमी फिरस्तीवर असल्याने व त्याचे कार्यालय कुठे आहे? बाबत तक्रारदार यांना निश्चित माहिती नसल्याने आम्ही सदर दिवसाची सापळा कारवाई स्थगित करण्याचे र्निणय घेवुन कारवाई स्थगित केली होती.

दिंनाक 20/03/2026 रोजी करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान श्री. गायकवाड यांनी तकारदार यांच्या दोन बोलेरो पिकअप गाडयाने लाकुड वाहतुक सुरळीत चालु देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 9000/- रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्यास संमती दर्शविली होती. त्यानंतर श्री. गायकवाड यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम तकारदार हे देण्यासाठी गेले असता त्यांनी तकारदार यांची भेट घेतली नाही तसेच तकारदार यांनी वेळोवेळी केलेल्या फोन कॉलला उत्तर दिले नाही. तसेच दिंनाक 21/03/2026 रोजी आम्ही पुन्हा सापळा कारवाई सुरू करून श्री. गायकवाड यांनी तकारदार यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम देण्यासाठी वेळोवेळी फोन केला असता श्री. गायकवाड यांचा फोन बंद स्थितीत मिळुन आला होता. म्हणुन आम्ही दिंनाक 20/03/2026 व दिंनाक 21/03/2026 रोजीची लाच मागणी पडताळणी / सापळापुर्व/यशस्वी सापळा कारवाई स्थगित करून पंचनामा केला आहे.

दिंनाक 22/03/2026 रोजी आम्ही तक्रारदार यांना फोन करून श्री. गायकवाड यांचे उपलब्धतेबाबत विचारणा केली असता, श्री. गायकवाड यांचा फोन बंद असुन त्यांचे कार्यालय नेमके कोठे आहे, याबाबत काहीएक माहीती नसल्याचे कळविले होते.

दिंनाक 23/03/2026 रोजी तकारदार यांना संपर्क करून ला.प्र.वि., जळगाव कार्यालयात बोलावुन घेतले. आम्ही तक्रारदार यांना दिंनाक 20/03/2026 व दिंनाक 21/03/2026 रोजी झालेल्या कारवाई संदर्भात थोडक्यात माहीती दिली व विचारणा केली असता त्यांचे सांगणे की, त्यांनी दिंनाक 20/03/2026 रोजी दिलेल्या तकारीच्या अनुषंगाने नाकेदार श्री. गायकवाड यांची लावमागणी पडताळणी केली असता श्री.गायकवाड यांनी तक्रारदार यांचेकडील दोन बोलेरो पिकअप गाडयाने लाकुड वाहतुक सुरळीत चालु देवुन कोणतीही कारवाई न करण्याकरीता पंचासमक्ष तकारदार यांचेकडे 9000/- रूपये लाचेची मागणी केली होती. ते मागणी केलेली लाच रक्कम देण्यासाठी गेलो असता श्री. गायकवाड यांची भेट झाली नाही. त्यावेळी तकारदार यांनी त्यांना फोन केला असता "मी पिळोदा ते पाडळसाचे मध्ये आहे" असे सांगुन तकारदार यांनी "मी तोल नाक्यावर उभा होता" असे

म्हटले असता नाकेदार श्री. गायकवाड यांनी "तुझा आवाज येत नाही "असे बोलुन फोन कट केला होता. त्यानंतर तकारदार यांनी पुन्हा फोन केला असता त्यांनी फोन घेतला नाही. त्यामुळे सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगित केली होती. दिंनाक 21/03/2026 रोजी नाकेदार श्री. गायकवाड यांनी मागणी केलेली लाच रक्कम 9000/- देण्यासाठी तकारदार यांनी वारंवार फोन केला परंतु त्यांनी तक्रारदार यांचा फोन न घेता तकारदार यांना भेटण्यासाठी टाळाटाळ केली होती. श्री. गायकवाड यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेसंदर्भात तकारदार यांची भेट घेण्यास टाळाटाळ केली होती तसेच तकारदार यांनी नाकेदार श्री. गायकवाड यांना वेळोवेळी फोन केल्यामुळे त्यांना तकारदार यांचेवर संशय आला असावा म्हणुन तकारदार यांचे कडुन लाचेची रक्कम स्विकारण्यास असमर्थता दर्शविली होती तसेच तकारदार यांनी यानंतर नाकेदार यांना लाचरक्कम स्विकारण्यास प्रत्यक्ष अथवा फोन करून भेटण्याचा प्रयत्न केला तर ते तकारदार यांना भेटणार नाही व ते लाच रक्कम स्विकारणार नाहीत याबाबत तकारदार यांची खात्री झाली आहे.

दिंनाक 20/03/2026 रोजी श्री. गायकवाड यांनी तक्रारदार यांचे दोन बोलेरो पिकअप गाडयाव्दारे लाकुड वाहतुक सुरळीत चालु देवुन कोणतीही कारवाई न करण्याकरीता 9000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले असुन त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विंनती आहे, अशी हकिकत सांगितल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे.सदर लाचमागणी प्रकारासंदर्भात आम्ही मा. पोलीस अधीक्षक, लाप्रवि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांना लोकसेवक नाकेदार श्री. गायकवाड, वन विभाग, यावल यांनी तक्रारदार यांचेकडे वरप्रमाणे मागणी केलेल्या लाचमागणीचे अनुषंगाने त्यांचेविरुध्द लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळणे संदर्भात सविस्तर अहवाल सादर केला होता. सदर अहवालाचे अवलोकानाअंती मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र नाशिक यांनी प्रस्तुत लाचमागणी प्रकरणी नाकेदार श्री. गायकवाड, वन विभाग, यावल यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

तरी दि. 20/03/2026 रोजी झालेल्या लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक नाकेदार श्री. गायकवाड, वन विभाग यावल यांनी तक्रारदार ज्ञानेश्वर कोळी यांचे दोन बोलेरो पिकअप गाडयाने लाकुड वाहतुक सुरळीत चालु देवुन कोणतीही कारवाई न करण्याकरीता पंचासमक्ष तकारदार यांचेकडे दोन्ही हाताच्या बोटांनी इशारा करून 9000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन भ्रष्ट व बेकायदेशीर मागनि पैशांच्या स्वरुपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले, म्हणुन माझी सरकारतर्फे नाकेदार श्री. गायकवाड, वन विभाग, यावल, जळगाव यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

rameshvar dagduji motale(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**

**Rank** (पद)**:** **No.**(क्र.)**:**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): rameshvar dagduji r
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
फैजपूर पो.स्टे.